


दैनिक
निडर निर्भिड
# जनसंचलन
व्यापक जनचळवळीचा प्रहरी!




संपादक : जितेंद्र कायस्थ Mob- 9822720784 Email- jansanchlan@gmail.com RNI NO-MAHMAR/2022/90217
वर्ष ३ रे अंक : ४२४ मंगळवार दि २८ जुलै २०२६ पृष्ठ ८ किमंत ३ रुपये

# शरद पवार यांची राष्ट्रवादी एनडीएमध्ये? मंत्री जयकुमार गोरे यांचे मोठे सूचक वक्तव्य, इंडिया आघाडीचे वाढणार टेन्शन?

वृत्तसंस्था/दिल्ली

शरद पवार यांची राष्ट्रवादी राष्ट्रीय लोकशाही आघाडीत ( -) जाण्याच्या चर्चांना मध्यंतरी ऊत आला. त्यातच विविध भेटीगाठींमुळे तर्क-वितर्क लढवले गेले. या वृत्तांची एकच चर्चा झाली. पावसाळी अधिवेशनातच मोठी घडामोड होण्याचे दावे-प्रतिदावे करण्यात आले. आता मंत्री जयकुमार गोरे यांनी याविषयावर एक सूचक वक्तव्य केल्याने राजकारणाला उकळी फुटली आहे. त्यांनी याप्रकरणी थेट भाष्य केले नसले तरी मोठे संकेत दिले आहेत. काय म्हणाले जयकुमार गोरे? राष्ट्रवादी शरद पवार गट एनडीए मध्ये सामील होण्याबाबत मंत्री जयकुमार गोरे यांनी सूचक विधान केले आहे. एनडीए म्हणून आम्ही एकसंध आहोत. माझ्या माहितीप्रमाणे एनडीए मध्ये एखादा दुसरा पक्ष वाढतोय पण कमी होण्याची शक्यता नाही. काहीजण बातम्या चालवत आहेत आणखी काही ॲडिशन होणार आहे डिलिशन नाही, असे सूचक वक्तव्य मंत्री गोरे यांनी केले आहे. इशाऱ्यातूनच त्यांनी हे संकेत दिले आहेत. भाजप नेते विनोद तावडे आणि शरदचंद्र पवार राष्ट्रवादी काँग्रेसचे नेते जयंत पाटील यांच्यात ३ जुलै २०२६ रोजी मुंबईतील एका पंचतारांकित हॉटेलमध्ये अनौपचारिक भेट झाली. या भेटीमुळे शरद पवार गट एनडीएमध्ये सहभागी होणार असल्याचा दावा करण्यात आला. पण जयंत पाटील यांनी पत्रकार परिषद घेत एका कामानिमित्त ही भेट झाल्याचा खुलासा केला. तर खासदार सुप्रिया सुळे यांनी सुद्धा कामानिमित्त ही भेट असल्याचे स्पष्ट केले. विनोद तावडे आणि जयंतराव पाटील यांच्या भेटीचा धुराळा खाली बसत नाही तोच ७ जुलै २०२६ रोजी ज्येष्ठ नेते शरद पवार आणि राज्याचे उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांच्यात भेट झाली. विधानभवनातील शिंदेंच्या दालनात ही भेट झाली. यावेळी शिंदे यांनी त्यांचा सत्कार केला. महाराष्ट्र-कर्नाटक सीमावादाबाबत महाराष्ट्र एकीकरण समितीच्या बैठकीनिमित्त ही भेट झाली आणि ती सदिच्छा भेट असल्याचे नंतर स्पष्टीकरण देण्यात आले. पण या भेटीने






राजकीय वर्तुळात मोठी चर्चा झाली. त्यावर खासदार संजय राऊत यांनी नाराजी व्यक्त केली. दिल्लीत गेल्या आठवड्यात जंतर मंतरवर कॉकरोच जनता पार्टी आणि विद्यार्थ्यांचे आंदोलन पेटलेले असताना बुधवारी शरद पवार यांनी संसदेत पंतप्रधान नरेंद्र मोदी यांची भेट घेतली. त्यावेळी आंदोलकांच्या मागण्यांसंदर्भात ही भेट झाल्याचा दावा करण्यात येत होता. पण अजित पवार यांच्या राष्ट्रवादीचे प्रदेशाध्यक्ष सुनील तटकरे यांनी केंद्रीय गृहमंत्री अमित शाह यांची भेट घेतल्यानंतर विविध दावे करण्यात येऊ लागले. तटकरे आणि शाह यांच्यात विविध मुद्यांवर चर्चा झाल्याचे सांगण्यात आले असले तरी राष्ट्रवादीच्या विलिनीकरणाविषयी ही भेट महत्त्वाचा असल्याचा दावा करण्यात येत आहे.

# नितीन गडकरींनी घेतली मोठी ॲक्शन, त्या अफवांवर थेट नेमकं काय केलं?




वृत्तसंस्था/नागपूर

केंद्रीय शिक्षण मंत्री धर्मेंद्र प्रधान यांच्या राजीनाम्यानंतर नितीन गडकरी यांच्या राजीनाम्याची मागणी सुरु आहे. नितीन गडकरी यांनी आता याबाबत मोठे पाऊल उचलले आहे. त्यांनी थेट बॉम्बे हायकोर्टात याचिका दाखल केली आहे. या याचिकेत ई२० इथेनॉल मिश्रण योजनेशी त्यांचा काहीही संबंध नाही असे म्हटले आहे. कारण ही योजना पेट्रोलियम मंत्रालय चालवते. त्यांनी मेटा, एक्स, गूगल, यूट्यूब आणि आयटी मंत्रालयासह अनेकविरुद्ध ११ कोटी रुपये नुकसान भरपाई मागितली आहे. केंद्रीय मंत्री नितीन गडकरी यांनी बॉम्बे हायकोर्टात ८६ पृष्ठांची एक याचिका दाखल केली आहे, ज्यात त्यांनी सांगितले आहे की सरकारच्या ई२० इथेनॉल मिश्रण योजनेशी त्यांचा काहीही संबंध नाही. त्यांनी मेटा, एक्स, गूगल, यूट्यूब आणि काही अज्ञात सोशल मीडिया युजर्सविरुद्ध कोर्टात केस दाखल करून सोशल मीडियावर व्हायरल होत असलेले एआयने तयार केलेले फेक व्हिडीओ आणि फोटो काढण्याची मागणी केली आहे, तसेच ११ कोटी रुपये नुकसान भरपाई मागितली आहे. गडकरी यांचे म्हणणे आहे की या पोस्ट्समध्ये त्यांना चुकीच्या पद्धतीने ई२० योजना आणि त्याच्याशी संबंधित कथित भ्रष्टाचाराशी जोडले जात आहे. खरं तर ही योजना पेट्रोलियम मंत्रालय चालवते. गडकरी यांनी बॉम्बे हायकोर्टात दाखल केलेल्या त्यांच्या ८६ पृष्ठांच्या याचिकेत सांगितले आहे की ई२० इथेनॉल मिश्रण योजनेशी त्यांचा काहीही संबंध नाही. त्यांनी सांगितले आहे की रस्ते परिवहन मंत्री असल्याने या योजनेत त्यांची कोणतीही भूमिका नाही, कारण हे मंत्रालय पेट्रोलियम मंत्रालयापासून वेगळे आहे आणि ई२० योजना पूर्णपणे पेट्रोलियम मंत्रालयाच्या अधीन चालते. वकील संदीप लड्डा यांच्यामार्फत दाखल केलेल्या या याचिकेनुसार इथेनॉल मिश्रण कार्यक्रमाची सुरुवात सन २००३ मध्ये झाली होती, जेव्हा सरकारने पेट्रोलमध्ये इथेनॉल मिसळण्याचे धोरण ठरवले होते. कालांतराने ही योजना वाढत गेली आणि सन २०२५-२६ मध्ये ती २० टक्के मिश्रण म्हणजे ई२० पर्यंत पोहोचली. गडकरी यांचे म्हणणे आहे की ही योजना पेट्रोलियम मंत्रालयच तयार आणि लागू करते. गडकरी यांनी या प्रकरणात ११ कोटी रुपये नुकसान भरपाई मागितली आहे. त्यांनी मेटा, एक्स, गूगल आणि यूट्यूबसोबतच केंद्रीय इलेक्ट्रॉनिक्स आणि माहिती तंत्रज्ञान मंत्रालय, दूरसंचार विभाग आणि काही अज्ञात युजर्सविरुद्ध कोर्टाचा आधार घेतला आहे. त्यांचे म्हणणे आहे की सोशल मीडियावर व्हायरल होणारे रील्स, मीम्स आणि मनगडंत विधाने राजकीय टीकेच्या मर्यादेपलीकडे जाऊन बदनाम करण्याचा प्रयत्न बनले आहेत. गडकरी यांनी कोर्टाकडे मागणी केली आहे की एआयने तयार केलेले फेक आणि मानहानिकारक व्हिडिओ आणि फोटो काढले जावेत. याचिकेत त्या पोस्ट्सचा उल्लेख केला आहे ज्यात गडकरी यांना ई२० पेट्रोल आणण्याचे आणि गाड्यांना नुकसान पोहोचवण्याचे जबाबदार ठरवले आहे.

# उपयुक्त झेब्रा मासे



वेगवेगळ्या आजारांवर उपचारांसाठी नवीन औषधांची निर्मिती सतत होत असते. मानवी शरीरावर उपचार करण्यापूर्वी या औषधांचे गुणधर्म आणि चाचण्या वेगवेगळ्या ङ्कमॉडेलफ प्राण्यांवर तपासण्यात येतात. कुत्रे, गिनी पिग, उंदीर, ससे, मासे, कापलेल्या फळांवरील ड्रॉसोफिलासारख्या बारीक माशा आदींचा औषधांचे प्रयोग यशस्वी करण्यामध्ये मोलाचा वाटा आहे. मॉडेल प्राणी आजारानुसार निवडले जातात. जनुकीय आजार समजून घेण्यासाठी होणाऱ्या प्रयोगांमध्ये झेब्रा मासे (दनियो रेरीयो) इतर मॉडेल प्राण्यांपेक्षा जास्त उपयुक्त ठरत आहेत. संशोधनाच्या मूलभूत तत्त्वानुसार मॉडेल प्राण्यांना पर्याय शोधणे, प्राण्यांवर चाचण्यांचे प्रमाण कमी करणे, तसेच दुखापत कमीत कमी व्हावी यासाठी प्राण्यांच्या चाचण्यांमध्ये सुधारणा करणे या निकषांवर झेब्रा मासे योग्य ठरले आहेत. त्यातील नर माश्यांच्या अंगावर निळे सोनेरी पट्टे, तर मादीच्या अंगावर निळे चंदेरी पट्टे असतात. चार ते पाच इंच लांबीचे हे मासे घरगुती मत्स्यालयांचे सौंदर्य वाढवतात. भारतात गंगा, ब्रह्मपुत्रा या गोड्या पाण्याच्या नद्यांच्या अधिवासात ते वाढतात. झेब्रा मासे इतर प्राण्यांच्या तुलनेत कमी खर्चिक आहेत, प्रयोगशाळेत त्यांना सांभाळणे सोपे आहे. ते भरपूर अंडी घालतात, त्यांचे भ्रूण पारदर्शक असतात व ते मादीच्या शरीराबाहेर वाढू शकतात. त्यामुळे त्यांची वेगाने होणारी वाढ सूक्ष्मदर्शकाखाली पाहता येते. त्यांची बरीचशी जनुके माणसाशी मिळतीजुळती आहेत. स्वित्झर्लंडमधील झुरिक विद्यापीठ आणि इटीएच विद्यापीठाच्या सहयोगाने या माशांच्या शरीरात सूक्ष्म रोबॉटद्वारा औषधे आजारी अवयवांपर्यंत पोहोचवण्याचे प्रयोग यशस्वी झाले आहेत. या प्रयोगात ज्या झेब्रा माश्यांच्या पाठीच्या कण्यास दुखापत झाली होती, त्यांचे पाठीचे कणे सूक्ष्म रोबॉटच्या उपचारांमुळे पूर्ववत झाले. रुग्णास कमी त्रासदायक शस्त्रक्रिया किंवा विना शस्त्रक्रिया उपचार करता यावेत, अशा पद्धतींचा शोध वैज्ञानिक सतत घेत असतात. त्यात झेब्रा माश्यांचा मोलाचा वाटा आहे.




The Daily News Paper Jansanchalan printed by owner, publisher and editor Jitendra Devchand Kayastha at Sarvadnya Printers Buldhana and published at Dainik Jansanchalan Office Shivshopping Complex Buldhana. Dainik Janasanchalan printers, owners and editors do not necessarily agree with the opinions published in the issue Court. 9822720784.
(RNI NO-MAHMAR/2022/90217) Email- jansanchlan@gmail.com

दैनिक निडर निर्भिड जनसंचलन
व्यापक जनचळवळीचा प्रहरी!



# आधी बंडखोरी आता उद्धव ठाकरेंसाठी सदिच्छा, ओमराजेंच्या नव्या पोस्टमुळे चर्चेला उधाण

**दिल्ली/वृत्तसंस्था**

ठाकरे यांच्या पक्षाच्या एकूण सहा खासदारांनी बंड करून उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांच्या शिवसेनेत प्रवेश केला. ठाकरेंच्या बंडखोर गटाच्या शिवसेनेतील विलिनीकरणास आता लोकसभा सचिवालयानेही परवानगी दिलेली आहे. शिंदे गटात प्रवेश करताच आता बंडखोर खासदार हे ठाकरे यांच्या पक्षावर टीका करत आहेत. याच बंडखोर खासदारांमध्ये धाराशिवचे खासदार ओमराजे निंबाळकर यांचाही समावेश आहे. त्यांनी मी शिंदे गटात जाणार असलो तरी भविष्यात कधीच ठाकरे कुटुंबावर टीका करणार नाही, असे तेव्हाच स्पष्ट केलेले आहे. असे असतानाच आता ओमराजे निंबाळकर यांच्या सोशल मीडिया





पोस्टची सगळीकडे चर्चा आहे. त्यांच्या या पोस्टवर लोकांनी वेगवेगळ्या कमेंट्स केल्या आहेत.ओमराजे निंबाळकर यांनी उद्धव ठाकरे यांच्यावर एक पोस्ट केली आहे. या पोस्टमध्ये त्यांनी ठाकरे यांना वाढदिवसानिमित्त शुभेच्छा दिल्या आहेत. 'आपणांस उत्तम आरोग्य आणि दीर्घायुष्य लाभो, या सदिच्छा,' असं ओमराजे आपल्या पोस्टमध्ये उद्धव ठाकरेंना उद्देशून म्हणाले आहेत. परंतु ओमराजे यांच्या या पोस्टवर लोकांनी वेगवेगळ्या प्रकारच्या कमेंट्स केल्या आहेत. लोकांनी ओमराजे यांच्यावर प्रश्नांचा भडिमार केला आहे. निंबाळकर यांना सोशल मीडियावर ट्रोलिंगचा सामना करावा लागला आहे. नेटकऱ्यांनी "तुम्ही खाल्ल्या मिठाला जागले नाही", "2029 ला तुम्ही कायम घरी जाणार आहात", "तुम्ही शुभेच्छा देण्याचा अधिकार गमावला आहे", अशा स्वरूपाच्या कमेंट्स नेटकऱ्यांनी केल्या आहेत.दुसरीकडे ठाकरे यांची साथ सोडल्यानंतर ओमराजे निंबाळकर यांचा सोशल मीडियावर टीकाचे सामना करावा लागला. त्यांचे एकूण 30 हजार फॉलोअर्स कमी झाले आहेत. सोशल मीडियावरील फॉलोअर्समध्ये झालेली ही घट आणि त्यावरून सुरू झालेली चर्चा राजकीय वर्तुळात लक्षवेधी ठरत आहे.ठाकरे गटातील सहा खासदारांनी बंडखोरी केली तेव्हा सर्वाधिक चर्चा ही ओमराजे निंबाळकर यांचीच झाली. ओमराजे यांच्या वडिलांच्या हत्येच्या खटल्याचा निकाल आला होता. विरोधात निकाल गेल्यानंतर त्यांनी मी माझ्या कार्यकर्त्यांशी अगोदर संवाद साधेन, त्यानंतरच शिंदे यांच्या पक्षात प्रवेश करेन, अशी भूमिका घेतली होती. त्यामुळे ओमराजे काय निर्णय घेणार, याची सगळीकडेच चर्चा सुरू होती. पण नंतर कार्यकर्त्यांसोबत बैठक घेतल्यानंतर त्यांनी शिंदे गटात जाण्याचा निर्णय जाहीर केला. त्यावेळीच मी कधीच ठाकरे कुटुंबावर टीका करणार नाही, असेही त्यांनी सांगून टाकले होते.

## राष्ट्रवादी NDA सोबत जाण्यावर शिक्कामोर्तब? तटकरे-शहांच्या भेटीने चर्चांना उधाण

**मुंबई/वृत्तसंस्था**

राज्याच्या राजकारणातून मोठी बातमी समोर आली आहे. शरद पवारांची राष्ट्रवादी NDA मध्ये सहभागी होणार असल्याची माहिती सूत्रांनी दिली आहे. काही दिवसांपूर्वी शरद पवार यांनी पंतप्रधान नरेंद्र मोदी यांची भेट घेतली आहे. तेव्हापासून शरद पवार यांची राष्ट्रवादी NDA मध्ये सहभागी होणार असल्याच्या चर्चांना वेग आला होता. मात्र आता पवारांची राष्ट्रवादी NDA मध्ये सहभागी होणार असल्याची माहिती वरिष्ठ नेत्यांनी मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस आणि उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांना दिली असल्याचे सूत्रांनी म्हटले आहे.गेल्या काही काळापासून शरद पवार यांची राष्ट्रवादी NDA मध्ये सामील होणार असल्याची चर्चा सुरू आहे. भाजपकडून NDA मध्ये सहभागी होण्यासाठी दोन्ही राष्ट्रवादीच्या विलिनीकरणाची अट घातल्याचेही समोर आले होते. त्यानंतर राष्ट्रवादीचे सर्वेसर्वा शरद पवार यांनी दिल्लीत पंतप्रधान नरेंद्र मोदी यांची भेट घेतली होती. या भेटीनंतर राष्ट्रवादी NDA मध्ये सामील होण्याच्या चर्चांना वेग आला होता. त्यानंतर आता सूत्रांनी भाजप पवारांच्या राष्ट्रवादीला NDA मध्ये सामील करून घेण्यास तयार



असल्याची माहिती दिली आहे. याबाबतच्या सूचनाही राज्यातील नेत्यांना देण्यात आल्या असल्याचेही समोर आले आहे. त्यामुळे आता आगामी काळात मोठ्या राजकीय घडामोडी पहायला मिळण्याची शक्यता आहे.समोर आलेल्या माहितीनुसार, शरद पवार यांच्या राष्ट्रवादीचे अनेक लोकप्रतिनिधी NDA सोबत जाण्यास तयार असल्याची माहितीही समोर आली आहे. तसेच आज अजित पवार यांच्या पक्षाचे प्रदेशाध्यक्ष सुनील तटकरे यांनी केंद्रीय गृहमंत्री अमित शाह यांची भेट घेतली. या भेटीत विविध मुद्द्यांवर चर्चा झाली आहे. यात शरद पवारांच्या राष्ट्रवादीला NDA मध्ये सहभागी करण्याबाबतही चर्चा झाल्याची माहिती समोर आली आहे. त्यामुळे आता आगामी काळात पवारांची राष्ट्रवादी NDA मध्ये सामील होऊ शकते. असं झाल्यास NDA ची केंद्रातील ताकदही वाढणार आहे. त्यामुळे राजकारणाला नवं वळण मिळण्याची शक्यता आहे.

## कॉकरोच जनता पार्टीची थेट सरकारला धमकी

**नाशिक :** कॉकरोच जनता पार्टीचे मोठे आंदोलन सुरू होते. या आंदोलनाला देशभरातून प्रतिसाद मिळाला. विद्यार्थी आक्रमक भूमिका घेताना दिसले. एक एक करून देशभरातील सर्व शहरांपर्यंत आंदोलन पोहोचले. विद्यार्थी सरकारविरोधात रस्त्यावर उतरले. जंतर मंतर मैदानावर आंदोलन सुरू असताना याच मुद्द्यात राहुल गांधी थेट पंतप्रधान नरेंद्र मोदी यांच्या घराबाहेर आंदोलनासाठी बसले. त्यानंतर वातावरण अधिकच चिघळताना दिसले.

20 जुलै रोजी मोठा मोर्चा संसदेवर निघाला. हा मोर्चा संसद परिसरात पोहोचला. त्यानंतर थेट मोठा हिंसाचार झाला. पोलिसांकडून आंदोलकांवर लाठीचार्ज करण्यात आला. अभिजीत दिपके यांनी सरकारला मोठा इशारा दिला. अभिजीत दिपकेने म्हटले की, जर आता धर्मेंद्र प्रधान यांचा राजीनामा घेतला नाही तर मोदींना आपला राजीनामा द्यावा लागेल.यामध्येच आता कॉकरोच जनता पार्टीने पुन्हा एकदा सरकारला मोठा इशारा दिला. कॉकरोच जनता पार्टीचे आंदोलन संपले आहे. मात्र, आंदोलकांवर कायदेशीर कारवाई केली जात आहे. त्यांना अटक केली जात आहे. सीजेपीचे प्रवक्ते सौरभ दास याने मोठे भाष्य केले.

## शिंदेंच्या मंत्र्याचं अभिजीत दीपकेच्या कुटुंबीयांशी नातं? मंत्र्यानेच दिली माहिती

**मुंबई/वृत्तसंस्था**

नीट पेपरफुटी प्रकरणी दिल्लीतील जंतर मंतर येथे कॉकरोच जनता पार्टीचे आंदोलन सुरु होते. येथे जमलेल्या लाखो विद्यार्थ्यांनी केंद्रीय शिक्षण मंत्री धर्मेंद्र प्रधान यांच्या राजीनाम्याची मागणी केली. या आंदोलनात राजकीय नेते आणि कलाकार देखील सहभागी झाले होते. त्यानंतर धर्मेंद्र प्रधान यांनी त्यांच्या पदाचा राजिनामा दिला. ते पाहून विद्यार्थ्यांनी जल्लोष साजरा केला. आता राज्यातील बड्या नेत्याचे कॉकरोच जनता पार्टीच्या संस्थापकाशी असलेलं नातं समोर आलं आहे. स्वत: या मंत्र्याने याबाबत खुलासा केला आहे.आम्ही ज्या मंत्र्याविषयी बोलत आहोत ते दुसरे तिसरे कोणी नसून सामाजिक न्याय मंत्री संजय शिरसाट आहे. संजय शिरसाट यांनी नुकताच माध्यमांशी संवाद साधताना अभिजीत दीपकेशी असलेले नात्याबद्दल खुलासा केला आहे. काल मी अभिजीतवदिपके यांच्या कुटुंबाची भेट घेतली. अभिजीतला मी लहानपणापासून पाहिलंय. माझा मुलगा त्याच्या बहिणीच्या हातून राखी बांधतो. ते माझे मतदार.. जवळचे आहेत. नातेवाईक आहेत. त्यांची विचारपूस करणे



गरजेचे वाटत होते. ते माझ्या कार्यक्रमाला येतात. मी त्यांच्या घरी पण गेलो.पुढे ते म्हणाले, दीपके यांनी सांगितले की त्यांना सगळ्यांचे कॉल आले. पण मी नाही केला म्हणून तो नाराज होता. दीपकेने आंदोलन केले भावनिक झाले. त्याने नोकरी करावी सुखात रहावे असे त्याच्या आई वडिलांची इच्छा आहे. राजकारणात त्यांना नाही यायचे. काही लोक ओढून राजकारणात आणण्याचे चालले आहे. इतर लोकांना काय राजकारण करता येईल याकडे लक्ष आहे. आंदोलन झाले एकीकडे पेढे वाटतात एकीकडे असेही प्रकार पाहायला मिळाले. महाराष्ट्राच्या मातीत ताकद आहे. मराठवाड्यानेही महाराष्ट्राचे नेतृत्व केले आणि देशाचे नेतृत्व घेतले. शरद पवार पण महाराष्ट्रात आहेत. ज्यांनी देशाचे नेतृत्व घेतले. शेवटी संजय शिरसाट म्हणाले की, संजय राऊत हे डोक्यावर पडलेले आहेत. धर्मेंद्र प्रधान यांच्याकडे पक्ष म्हणून पाहिले.

## रुग्णालयातून डिस्चार्ज, पण घरी जाणार नाहीत सोनम वांगचुक, मोठा निर्णय

**ठाणे/वृत्तसंस्था**

दिल्लीतील जंतर मंतर येथे मोठे आंदोलन झाले. कॉकरोच जनता पार्टीकडून आंदोलन करण्यात आले. या आंदोलनाला देशभरातून प्रतिसाद मिळाला. विद्यार्थी रस्त्यावर उतरले. एक मोठे आंदोलन उभे राहिले. आंदोलक आक्रमक होताना दिसले. पोलिसांना दिल्लीत लाठीचार्ज करावा लागला. पोलिसांनाही मारहाण झाली. मुंबई, पटनासह अन्य मोठ्या शहरांमध्ये विद्यार्थी रस्त्यावर उतरले. अखेर सरकारने केंद्रीय शिक्षणमंत्री धर्मेंद्र प्रधान यांचा राजीनामा घेतला. हा मोदी सरकारमधील पहिला राजीनामा ठरला. विरोधकांकडून पावसाळी अधिवेशनातही मोठा हंगामा केला जात आहे. पेपरफुटीविरोधाती विधेयक संसदेत आज ठेवण्यात आले. पेपरफुटीविरोधात कडक पाऊले उचलली जात आहेत. अभिजीत दिपकेच्या आंदोलनाला खरे बळ सोनम वांगचुक यांच्यामुळे मिळाले. सोनम वांगचुक तब्बल 26 दिवस उपोषणावर होते. सोनम वांगचुक यांची तब्येत खालावल्याने सरकारकडून त्यांना उपचारासाठी रूग्णालयात दाखल करण्यात आले. सोनम वांगचुक यांच्यानंतर अभिजीत दिपकेने उपोषणाची धूरा आपल्या हातात घेतली. जेपी नड्डा यांच्या उपस्थितीमध्ये सोनम वांगचुक यांनी उपोषण सोडले. पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनीही सोनम वांगचुक यांच्या चांगल्या आरोग्यासाठी प्रार्थना केली.आता सोनम वांगचुक यांना रुग्णालयातून डिस्चार्ज





मिळाला असून, त्यांनी सोशल मीडियावर एका व्हिडिओद्वारे ही माहिती दिली. पण डिस्चार्ज मिळाल्यानंतर ते लगेचच घरी जाणार नाहीत. सोनम वांगचुक सर्वात अगोदर आपल्या घरी न जाता राजघाटावर जाणार आहेत, याबाबतची माहिती त्यांनी स्वत: दिली. सोनम वांगचुक यांच्या चांगल्या आरोग्यासाठी देशभरातून प्रार्थना करण्यात आल्या.सोनम वांगचुक यांची तब्येत सतत खालावत होती. त्यानंतर सरकारने अचानक त्यांना जंतर मंतरवरून थेट रुग्णालयात दाखल केले. त्यानंतर आता सोनम वांगचुक यांची तब्येत सुधारताना दिसत आहे. सोनम वांगचुक यांच्या उपोषणामुळे या आंदोलनाला बळ मिळाले.

देशभरातून लोक सोनम वांगचुक यांचे समर्थन करताना दिसले. शेवटी धर्मेंद्र प्रधान यांच्या राजीनाम्यानंतर त्यांना यश मिळाले. अभिजीत दिपके देखील जंतर मंतरमधील आंदोलनानंतर अद्याप आपल्या घरी पोहोचला नाही. याबाबत कुटुंबियांनीच माहिती दिली.

# 1660 किमीचा प्रवास, मुंबईत येताच डब्यात सापडले मानवी पाय, प्रचंड खळबळ; 10 दिवसानंतरही...

**मुंबई/वृत्तसंस्था**

कल्पना करा... तुम्ही ट्रेनमधून प्रवास करत आहात. अचानक कोचच्या खाली कापलेला मानवी पाय दिसतो. काय कराल? गेल्या आठवड्यात मुंबईच्या छत्रपती शिवाजी महाराज टर्मिनसमध्ये हेच घडलं. अमृतसरहून 600 किलोमीटरचा प्रवास करून आलेली एक्सप्रेस मुंबईत थांबली. त्यावेळी रुटीन साफसफाई सुरू असतानाच कर्मचाऱ्यांचे धाबे दणाणले. कोचमध्ये मानवी पाय सापडले आणि खळबळ उडाली. आता 10 दिवस झाले तरी ही मर्डर मिस्ट्री अद्याप सुटलेली नाही. अमृतसर एक्सप्रेसच्या डब्यात सापडलेल्या मानवी पायाचे गूढ अद्याप कायम आहे. अमृतसर-सीएसएमटी एक्सप्रेसच्या एम-2 डब्यात मानवी पाय आढळल्याने खळबळ उडाली होती. या घटनेनंतर जीआरपीने तपास सुरू केला असून हा अवयव कोणाचा आहे, याचा शोध घेतला जात आहे. रेल्वे मार्गावरील अपघात किंवा आत्महत्येशी या घटनेचा संबंध असण्याची शक्यता व्यक्त करण्यात आली आहे. डीएनए चाचणीसह विविध तांत्रिक तपासांच्या माध्यमातून मृत व्यक्तीची ओळख पटवण्याचे प्रयत्न सुरू आहेत.17 जुलै रोजी सकाळी ट्रेन नंबर 11058 (अमृतसर-सीएसएमटी एक्सप्रेस) यार्डात आली. यार्डात ट्रेनच्या रुटीन सफाईचं काम सुरू होतं. कामगार गप्पा मारत, थट्टामस्करी करत काम करत होते. त्यानंतर पहाटे 6 ते दुपारी 2 वाजेच्या दरम्यान अंडरगियर इन्स्पेक्शन सुरू झालं. तेव्हा अचानक मानवी पाय कर्मचाऱ्यांना दिसले. गुडघ्यापासून कापलेला एक पाय दिसला. ट्रेनच्या M2 कोचच्या ट्रॉली आणि व्हील असेंबलीमध्ये हा पाय फसलेला होता. या कर्मचाऱ्यांनी तात्काळ जीआरपीला खबर दिली. पंचनामा करण्यात आला. कापलेला पाय फॉरेन्सिक तपासणीसाठी सेंट जॉर्ज रुग्णालयात पाठवण्यात आला.या घटनेला आज 10 दिवस होत आले आहेत. पण हा पाय



कुणाचा आहे? तो कोणी आणून ठेवला? या प्रश्नांचं उत्तर अजूनही जीआरपीवाले शोधत आहेत. ट्रेन 15 जुलैच्या सकाळी अमृतसरहून निघाली होती. 17 जुलै रोजी दुपारी सुमारे 12.15 वाजता मुंबईला पोहोचली. या प्रवासा दरम्यान कोणतीही धडक झाली नाही. कोणीही ट्रेन खाली आल्याची घटना घडलेली नाही. रेल्वे प्रोटोकॉलनुसार कोणतीही घटना घडली की लगेच कंट्रोल रुमला अलर्ट करावं लागतं. पण तसं काहीच घडलेलं नव्हतं. पोलिसांनी तात्काळ या खुनाची गंभीर दखल घेऊन अमृतसरपासून मुंबईपर्यंतच्या सर्व रेल्वे पोलीस ठाण्यांना अलर्ट जारी केला आहे. 15 ते 17 जुलैच्या दरम्यान म्हणजे गेल्या दोन आठवड्यात कुठेही रेल्वे अपघात किंवा आत्महत्या करण्यात आली का? याची रिपोर्ट मागवण्यात आली आहे.

चौकशी दरम्यान, एक क्ल्यू मिळाला आहे. उत्तर प्रदेशच्या ललितपूरमधून. तिथे नुकतेच दोन रेल्वे अपघात झाले होते. एक प्रकरण पोलिसांनी फेटाळून लावलं आहे. कारण मेलेल्या व्यक्तीचे दोन्ही पाय सुरक्षित आहेत. पण दुसरं प्रकरण अजूनही चौकशीच्या फेऱ्यात आहेत. या दुसऱ्या व्यक्तीचं शरीर छिन्नविच्छिन्न झालेलं आहे. त्याची ओळख पटनासी झालीय. शिवाय त्याचा एक पाय गायब आहे. जीआरपी आता ललितपूरच्या पोस्टमार्टेम करणाऱ्या डॉक्टरांकडून अधिक माहिती घेण्याचा प्रयत्न करत आहे. ब्लड सँपलची तपासणी केली जात आहे. जर रक्त जुळले तर त्याची खातरजमा करण्यासाठी डीएनए चाचणीही केली जाणार आहे. या प्रकरणाचा तपास करणाऱ्या एका पोलीस अधिकाऱ्याच्या मते, आम्ही प्रत्येक शक्यतेचा तपास करत आहोत. त्यावर काम करत आहोत. एखाद्या दुर्घटनेत

## आधी ढकललं... मग काठीने बेदम मारहाण; वर्दीतल्या पोलिसासोबत भयंकर घडलं

**ठाणे/वृत्तसंस्था**

ठाणे जिल्ह्यातील कल्याणमधून मोठी बातमी समोर आली आहे. कल्याण पश्चिम परिसरातील गौरीपाडा भागात एका मद्यधुंद तरुणाने पोलिस कर्मचाऱ्यावर काठीने हल्ला केल्याचे समोर आले आहे. हा संपूर्ण प्रकार सीसीटीव्ही कॅमेऱ्यात कैद झाला आहे. गणेश चव्हाण असे मारहाण झालेल्या पोलिस कर्मचाऱ्याचे नाव आहे. तर राहुल तायडे असं मारहाण करणाऱ्या मद्यधुंद तरूणाचे नाव आहे. हे संपूर्ण प्रकरण नेमकं काय आहे याबाबत सविस्तर माहिती जाणून घेऊयात. समोर आलेल्या माहितीनुसार, पोलिसावर हल्ला करणारा हा आरोपी परिसरातील नागरिकांच्या घराबाहेर उभा राहून गोंधळ घालत होता. त्यामुळे स्थानिक नागरिकांनी पोलीस नियंत्रण कक्षाला याची माहिती दिली होती. तक्रार मिळाल्यानंतर खडकपाडा पोलीस ठाण्यात कार्यरत असलेले पोलीस कर्मचारी गणेश चव्हाण घटनास्थळी पोहोचले. त्यावेळी राहुल तायडे नावाच्या तरुणाने प्रथम त्यांच्याशी वाद घातला आणि त्यानंतर काठीने मारहाण केली. या घटनेचा व्हिडिओ समोर आला आहे.आरोपी राहुल तायडे गोंधळ घालत असल्याने नागरिकांनी 112 वर कॉल करून तक्रार केली होती. या तक्रारीची पडताळणी करण्यासाठी पोलिस कर्मचारी गणेश चव्हाण हे गेले होते. यावेळी आरोपी राहुल तायडे याने पोलिस कर्मचारी गणेश चव्हाण यांची कॉलर पकडून कानशिलात मारत ठोसे-बुक्क्यांनी बेदम मारहाण केली. पोलिसाचे डोके भिंतीवर आपटून लाकडी दांडक्याने डोक्यावर वार करण्याचा प्रयत्न केला. मात्र यावेळी चव्हाण यांनी हात आडवा केल्याने मोठी दुखापत टळली आहे.नेमप्लेट आणि लॅनयार्डचे नुकसान झाले आहे. आरोपीने चाकू काढून पोलिसाच्या पोटावर वार करण्याचाही प्रयत्न केला, मात्र पोलिस कर्मचाऱ्याने प्रसंगावधान राखत वार चुकवला. आरोपी हा निवृत्त पोलीस कर्मचाऱ्यांचा मुलगा असल्याची प्राथमिक माहिती समोर आली आहे. आता आरोपीवर सरकारी कामात अडथळा आणल्याचा आरोप केला जात आहे. या आरोपीविरोधात खडकपाडा पोलिस ठाण्यात गंभीर कलमांखाली गुन्हा दाखल करण्यात आला असून त्याला अटक करण्यात आली आहे. तसेच पोलीस तपास सुरू करण्यात आला आहे.

## नवदाम्पत्याचा करुण अंत

**नाशिक :** जिल्ह्यात कळवण तालुक्यातील पिळकोस फाट्याजवळ रविवारी सकाळी ८.१५ वाजताच्या सुमारास मॅक्झिमो वाहन आणि दुचाकीच्या धडकेत नवविवाहित दाम्पत्याचा मृत्यू झाला, तर पत्नीची बहीण गंभीर जखमी आहे. दिनेश करणसिंग गावित व कीर्ती दिनेश गावित अशी मृतांची नावे आहेत.दिनेश व कीर्ती आणि कीर्तीची बहीण त्रिशा गावित दुचाकीवरून प्रतापपूर येथे नातेवाइकाच्या अंत्यविधीसाठी जात होते. खामखेड्याकडून पिळकोसकडे येणाऱ्या मॅक्झिमोची त्यांच्या दुचाकीला जोरदार धडक बसली.तिघांना कळवण उपजिल्हा रुग्णालयात दाखल करून पुढील उपचारासाठी नाशिक जिल्हा रुग्णालयात दाखल करण्यात आले. उपचारादरम्यान दिनेश व कीर्ती यांचा मृत्यू झाला. त्रिशाची प्रकृती गंभीर आहे.कीर्ती अभोणा येथील जनता विद्यालयात शिक्षिका होत्या, तर दिनेश जलसंपदा विभागात कार्यरत होते. मे महिन्यातच त्यांचा विवाह झाला होता. नवदाम्पत्याच्या मृत्यूने कुटुंबीय, नातेवाईक, शिक्षक आणि विद्यार्थ्यांमध्ये हळहळ व्यक्त होत आहे.पोलिस निरीक्षक खगेंद्र टेंभेकर यांच्या मार्गदर्शनाखाली पोलिस नाईक रामदास गवळी व शिपाई नितीन वाघमारे पुढील तपास करीत आहेत.

## फसवणुकीचा गुन्हा दाखल करण्यासाठी ६० वर्षीय व्यक्तीकडे लाच मागणं महागात

**छत्रपती संभाजीनगर/वृत्तसंस्था**

रक्षकच भक्षक बनल्याचा धक्कादायक प्रकार छत्रपती संभाजीनगरमध्ये उघडकीस आला आहे. शहरातील पोलीस आयुक्तालयातील आर्थिक गुन्हे शाखेत कार्यरत असलेले पोलीस उपनिरीक्षकाने ६० वर्षीय ज्येष्ठाकडे ५० हजार रुपयांची लाच मागितल्याप्रकरणी त्याच्याविरोधात लाचलुचपत प्रतिबंधक विभागाने गुन्हा दाखल केला आहे.

या कारवाईमुळे पोलीस दलात मोठी खळबळ उडाली आहे. चंद्रकांत कामठे (वय ३८, रा. सातारा परिसर) असे लाचेची मागणी करणाऱ्या पोलिस उप निरीक्षकाचे नाव आहे. या प्रकरणी मिळालेल्या माहितीनुसार, ६० वर्षीय तक्रारदाराने दिलेल्या अर्जावरून फसवणुकीचा गुन्हा दाखल करण्यात आला होता. हा गुन्हा दाखल केल्याचे बक्षीस म्हणून तसेच प्रकरणातील आरोपींना अटक करून गुन्ह्यात मदत करण्यासाठी पीएसआय चंद्रकांत कामठे याने स्वतःसाठी आणि पोलीस निरीक्षक पवार यांच्यासाठी ५० हजार रुपयांच्या लाचेची मागणी २७ फेब्रुवारी २०२६ रोजी केली होती. तक्रारदाराची लाच देण्याची अजिबात इच्छा नसल्याने त्यांनी थेट लाचलुचपत प्रतिबंधक विभाग छत्रपती संभाजीनगर येथे जाऊन तक्रार नोंदवली. तक्रारीच्या अनुषंगाने एसीबीच्या पथकाने ११ मार्च २०२६ रोजी पंचांसमक्ष लाच मागणीची पडताळणी केली. त्यावेळी पीएसआय कामठे यांनी स्वतःसाठी व पो.नि. पवार यांच्यासाठी ५० हजार रुपयांची लाच मागितल्याचे आणि तडजोडीअंती ती स्वीकारण्याचे पंचांसमक्ष मान्य केले.

दुसऱ्या दिवशी १२ मार्च रोजी पुन्हा तक्रारदाराला पाठवण्यात आले, मात्र त्या दिवशी पोलीस निरीक्षक पवार यांची भेट झाली नाही.दरम्यानच्या काळात आरोपी पीएसआय कामठे यांना एसीबीच्या कारवाईचा संशय आल्याने त्याने तक्रारदाराला भेटणे टाळण्यास सुरुवात केली. तसेच मध्यंतरी पो.नि. पवार यांची त्या ठिकाणाहून बदली झाली. त्यामुळे आता कामठे लाचेची रक्कम स्वीकारणार नाहीत, असा जबाब तक्रारदाराने दिला. मात्र, पंचांसमक्ष ५० हजारांची लाच मागितल्याचे निष्पन्न झाल्याने एसीबीने पीएसआय कामठे यांच्यावर गुन्हा दाखल केला.

## आईला धक्का, अंकिता हे काय करून बसली? १९ वर्षीय तरुणीच्या कृतीने कुटुंबाला धक्का

**अहिल्यानगर/वृत्तसंस्था**

कर्जत तालुक्यातील जलालपूर इथं नीट परीक्षेत अपेक्षित गुण न मिळाल्याच्या नैराश्यातून १९ वर्षीय विद्यार्थिनीने गळफास घेऊन आत्महत्या केल्याची घटना शनिवारी सायंकाळी घडली आली. अंकिता सुरेश सांगळे असं जीवन संपवलेल्या विद्यार्थिनीचे नाव असून तिने डॉक्टर होण्याचं स्वप्न डोळ्यांत साठवलं होतं, मात्र कट-ऑफपेक्षा ११ गुणांनी मागे पडल्याने आलेल्या मानसिक तणावातून तिने हा टोकाचा निर्णय घेतला आहे. या घटनेनं जलालपूरसह कर्जत तालुका शोकमग्न झाला असून परीक्षांच्या वाढत्या मानसिक तणावाचा प्रश्न पुन्हा एकदा ऐरणीवर आला आहे.मिळालेल्या माहितीनुसार, अंकिता सांगळे हिने राहत्या घरातील स्वतंत्र अभ्यासिकेत गळफास घेऊन आत्महत्या केली. घटना घडली तेव्हा तिचे वडील आणि भाऊ पंढरपूर येथे दर्शनासाठी गेले होते, तर आई घरकामात व्यस्त होती. बराच वेळ मुलीकडून कोणतीही हालचाल न झाल्याने आईने अभ्यासिकेचा दरवाजा उघडला असता अंकिताने गळफास घेतल्याचे भीषण दृश्य समोर आले. त्यांच्या आरडाओरडीनंतर शेजाऱ्यांनी घटनास्थळी धाव घेतली आणि पोलिसांना माहिती देण्यात आली. घटनेची माहिती मिळताच कर्जत पोलीस ठाण्याचे



पोलीस निरीक्षक हनुमान गायकवाड यांनी घटनास्थळी भेट देऊन पंचनामा केला. मृतदेह शवविच्छेदनासाठी रुग्णालयात पाठवण्यात आला. अंकिताचे काका अण्णा सांगळे यांनी दिलेल्या खबरीवरून कर्जत पोलीस ठाण्यात आकस्मिक मृत्यूची नोंद करण्यात आली असून पुढील तपास सुरू आहे.आत्महत्येपूर्वी अंकिताने लिहिलेल्या चिठ्ठीत तिने नीट परीक्षेत १६६ गुण मिळाल्याचा उल्लेख केला असून कट-ऑफ १७७ गुणांचा असल्याने डॉक्टर होण्याचे स्वप्न भंग झाल्याची वेदना व्यक्त केली आहे. विशेष म्हणजे, माझ्या आत्महत्येसाठी आई-वडील, भाऊ किंवा कुटुंबातील कोणालाही जबाबदार धरू नये, असं लिहिलं आहे.फेरपरीक्षेत अपेक्षेपेक्षा कमी गुण मिळाल्याने अंकिता प्रचंड मानसिक तणावाखाली गेली होती. डॉक्टर होण्याच्या ध्येयासाठी सातत्याने मेहनत घेणाऱ्या अंकिताला अपयशाचा मोठा धक्का बसल्याचे नातेवाईकांनी सांगितले. अंकिताचे काका अण्णा सांगळे यांनी सांगितलं की, ती अत्यंत अभ्यासू होती. डॉक्टर होण्याचं तिचं स्वप्न होते. अवघ्या ११ गुणांनी ती कट-ऑफपासून मागे राहिली आणि त्याचाच तिला मोठा मानसिक धक्का बसला.

दरम्यान, पोलीस निरीक्षक हनुमान गायकवाड यांनी सांगितलं की, उपलब्ध माहितीनुसार आकस्मिक मृत्यूची नोंद करण्यात आली असून सर्व बाबींचा सखोल तपास सुरू आहे.

# झिम्बाब्वेविरुद्ध खराब कामगिरीमुळे खचून गेला अभिषेक शर्मा; पण सूर्या दादाने जे केलं त्याचं कौतुक



■ मुंबई/वृत्तसंस्था

भारत आणि झिम्बाब्वे यांच्यात टी-20 सामन्यांची मालिका पार पडली जी भारतीय संघाने जिंकली. भारतीय संघाने जोरदार कमबॅक केला आहे. भारतीय संघाने या मालिकेतील तिन्ही सामने जिंकले. यापूर्वीच्या दोन मालिका गमावल्यानंचर प्रचंड ट्रोलिंगचा सामना करावा लागला. या मालिकेत वैभव सूर्यवंशीवर विशेष लक्ष होते. तर त्याने या मालिकेत तशी कामगिरीही केली. आता या मालिकेत अभिषेक शर्माला हवी तशी कामगिरी करता आलेली नाही. अभिषेक शर्मालाही त्याची कामगिरी आवडलेली नाही. यामुळे आता अभिषेक शर्मानि या संदर्भात एक पोस्टही शेअर केली आहे. जी आता प्रचंड व्हायरल होत आहे. पण पोस्ट चर्चेत येण्यामागचे कारण म्हणजे या पोस्टवर सूर्यकुमार यादवने केलेली कमेंट.अभिषेक शर्मा हा केवळ भारतातीलच नव्हे तर जगातील सर्वात धोकादायक सलामीवीरांपैकी एक आहे. तो त्याच्या स्फोटक फलंदाजीसाठी ओळखला जातो, पण झिम्बाब्वेविरुद्धच्या तीन सामन्यांच्या टी-20 आंतरराष्ट्रीय मालिकेत तो पूर्णपणे अपयशी ठरला. अभिषेक तीन सामन्यांमध्ये केवळ 11 धावाच करू शकला. अभिषेक आपल्या कामगिरीवर स्पष्टपणे नाराज होता आणि मालिका संपल्यानंतर त्याने सोशल मीडियावर आपली खंत व्यक्त केली. झिम्बाब्वे दौरा संपल्यानंतर अभिषेक शर्मानि इंस्टाग्रामवर एक पोस्ट केली. तो आपल्या कामगिरीवर नाराज दिसत होता, पण कठोर परिश्रमातून जोरदार पुनरागमन करण्याचा विश्वास त्याने व्यक्त केला. तो म्हणाला, "जेव्हा लोकांच्या तुमच्याकडून अपेक्षा असतात आणि तुम्ही त्या पूर्ण करू शकत नाही, तेव्हा वाईट वाटते. हा खेळ नेहमीच कठोर परिश्रम करणाऱ्यांना फळ देतो. संघ जिंकला याचा मला आनंद आहे. मी जोरदार पुनरागमन करेन."भारतीय संघाचा माजी कर्णधार सूर्यकुमार यादवने अभिषेक शर्माच्या पोस्टवर कमेंट करत, त्याला प्रोत्साहन दिले आणि गेल्या दोन वर्षांत भारतासाठी दिलेल्या त्याच्या योगदानाची आठवण काढली. सूर्यकुमार म्हणाले, "गेल्या दोन वर्षांपासून तू आम्हाला सातत्याने हसण्याची कारणे दिली आहेस. जेव्हा सर्वात जास्त गरज होती, तेव्हा तू भारतासाठी सर्वोत्तम कामगिरी केलीस. आता फक्त वेळेची गोष्ट आहे. स्वतःशी प्रामाणिक राहा."

अभिषेक शर्मासाठी झिम्बाब्वे दौरा विसरण्यासारखा ठरला, कारण तो तीन सामन्यांमध्ये फक्त 11 धावा करू शकला. मात्र, त्याचा सलामीचा साथीदार वैभव सूर्यवंशीसाठी ही मालिका पूर्णपणे वेगळी ठरली. त्याने दोन अर्धशतकांसह तीन सामन्यांमध्ये 151 धावा केल्या. झिम्बाब्वेविरुद्धच्या मालिकेत वैभवची सरासरी 50.33 होती आणि त्याने 196.10 च्या स्ट्राइक रेटने फलंदाजी केली. आशा आहे की, अभिषेक आशियाई क्रीडा स्पर्धेत आपला फॉर्म परत मिळवेल.

## शर्मासाठी टीम इंडियाचा नियम वेगळा का ? क्रिकेटपटूने उपस्थित केला प्रश्न

■ मुंबई/वृत्तसंस्था

अभिषेक शर्मासाठी 2026 हे वर्ष काही ठरताना दिसत आहे. टी20 संघात त्याचं स्थान कायम असलं तरी त्याची कामगिरी निराशाजनक आहे. इंग्लंड आणि झिम्बाब्वे दौरा त्याच्यासाठी वाईट स्वप्न ठरलं आहे. इंग्लंडविरुद्धच्या पाच सामन्यांच्या टी20 मालिकेत काही खास करू शकला नाही. इतकंच काय झिम्बाब्वेतही त्याची बॅट काही चालली नाही. त्याची सुमार कामगिरी पाहून हनुमा विहारी याने टीम इंडियावर निशाणा साधला आहे. हनुमा विहारीने थेट प्रश्न केला की, संजू सॅमसनने पाच सामन्यात सुमार कामगिरी केल्यानंतर त्याला संघातून बाहेर काढलं होतं. आता अभिषेक शर्मासोबत असं का केलं जात नाही? येथे प्रत्येक खेळाडूला वेगळा नियम आहे का?हनुमा विहारीने आपल्या युट्यूब चॅनेलवर जोरदार टीकास्त्र सोडलं आहे. हनुमा विहारी म्हणाला की, 'वर्ल्डकपपूर्वी संजू सॅमसन पाच सामन्यात चांगली कामगिरी करू शकला नाही आणि त्याला प्लेइंग 11 मधून आपलं स्थान गमवावं लागलं. यानंतर कमबॅक केलं आणि टी20 वर्ल्डकप स्पर्धेत प्लेयर ऑफ द टूनमिंट ठरला. त्या स्पर्धेत अभिषेक शर्मानि किती धावा केल्या?'हनुमा विहारीने पुढे सांगितलं की, 'युकेत झालेल्या मालिकेत अभिषेक शर्मानि एक अर्धशतक ठोकलं. या व्यतिरिक्त त्याने एकीह मोठी खेळी खेळली नाही. मागच्या आठ सामन्यात एक अर्धशतक आहे. मागच्या 18 सामन्यात तीन अर्धशतक आहे. सॅमसन वर्ल्डकप स्पर्धेत किती सामने खेळला? तर तीन.. तीन सामन्यात त्याने अर्धशतक ठोकलं. अभिषेक शर्माचा मागच्या पाच सामन्याती सर्वोत्तम स्कोअर हा 16 आहे. कोणीही याबाबत बोलत का नाही. प्रत्येक खेळाडूसाठी वेगळे नियम आहेत का?'अभिषेक शर्माची या वर्षात कामगिरी काही खास राहिली नाही. त्याने या वर्षात खेळलेल्या 23 सामन्यात 23.36 च्या सरासरीने 514 धावा केल्या आहेत. त्याने पाच अर्धशतकं ठोकली आहेत. या पर्वात अभिषेक शर्माची सरासरी 19.1ची आहे. 10 सामन्यात त्याने 191 धावा केल्या आहेत. झिम्बाब्वेविरुद्धच्या मालिकेत तर 11 धावा करू शकला. त्यामुळे अभिषेक शर्मावर दबाव वाढला. त्याच्यापेक्षा वैभव सूर्यवंशीची कामगिरी चांगली आहे.

## विराट-अनुष्का पुन्हा भारतात परतणार?

**मुंबई :** भारताचा स्टार फलंदाज विराट कोहली आणि त्याची पत्नी बॉलिवूड स्टार अनुष्का शर्मा पुन्हा एकदा चर्चेत आले आहेत. या दांपत्याने मुंबईच्या वर्सोवा भागात 18.29 कोटी रुपयांना एक अलिशान अपार्टमेंट विकत घेतलं आहे. रिपोर्टनुसार, हा अपार्टमेंट अंधेरी पश्चिमेच्या प्रीमिय प्रोजेक्ट गोदरेज स्कायशोरच्या वरच्या मजल्यावर घेतला आहे. प्रॉपर्टी रजिस्ट्रेशन प्लॅटफॉर्म Zapkey.com ला मिळालेल्या कागदपत्रांनुसार, हा फ्लॅट वर्सोवा येथील 'गोदरेज स्कायशोर' इमारतीच्या सर्वात वरच्या मजल्यावर आहे. या मालमत्तेची नोंदणी 21 जुलै 2026 रोजी करण्यात आली असून, 1.09 कोटी रुपयांचे मुद्रांक शुल्क आणि 30 हजार रुपयांचे नोंदणी शुल्क भरण्यात आले आहे. सध्या हे स्टार कपल दोन्ही मुलांसह लंडनमध्ये राहात आहे. मिडिया आणि झगमगाटापासून दूर ठेवण्यासाठी त्यांनी हा निर्णय घेतला होता. मात्र आता भारतात परतण्याचा विचार करत असल्याचं दिसत आहे. मात्र भारतात परतणार की गुंतवणूक म्हणून हा अपार्टमेंट घेतला आहे सांगणं कठीण आहे.मुंबईतील वर्सोवा भाग हा शहरातील सर्वाधिक मागणी असलेल्या आलिशान निवासी भागांपैकी एक आहे.

## 9 वर्षांनी मोठ्या असलेल्या मराठी अभिनेत्रीला डेट करतोय का जयस्वाल ?

■ मुंबई/वृत्तसंस्था


सोशल मिडिया म्हणजे मुक्त व्यासपीठ.. या व्यासपीठावर कधी कोणासोबत सूत जुळवलं जाईल सांगता येत नाही. खासकरून सेलिब्रेटींच्या बाबतीत सोशल मीडियायवर कायम धुराळा उडत असतो. त्यांच्या खासगी आयुष्याबाबत आणि माहित नसलेल्या घटनांबाबत सोशल मीडियावर चर्चा रंगतात. क्रिकेटपटू यशस्वी जयस्वाल अशाच एका चर्चेमुळे प्रकाशझोतात आला आहे. एका व्हायरल व्हिडीओमुळे नेटकरी त्याचं नातं 33 वर्षांच्या एक बॉलिवूड अभिनेत्रीसोबत जोडत आहेत. ही अभिनेत्री दुसरी तिसरी कोणी नसून मृणाल ठाकुर आहे.. या दोघांमध्ये अफेयर आणि डेटिंगच्या वावड्या आता सोशल मीडियावर उठल्या आहे. सध्या एका व्हायरल व्हिडीओवरून नेटकरी हा अंदाज बांधत आहेत. एका कॅफेबाहेरचा व्हिडीओ यासाठी निमित्त ठरला आहे.व्हायरल व्हिडीओत अभिनेत्री मृणाल ठाकुर आधी कॅफेतून बाहेर पडते. त्यानंतर थोड्या वेळाने भारतीय क्रिकेटपटू यशस्वी जयस्वाल बाहेर येतो. यशस्वी जयस्वाल कॅफेतून बाहेर पडल्यानंतर थेट कारमध्ये बसतो आणि रवाना होतो. खरं तर या व्हिडीओत इतकंच आहे. तरीही नेटकरी काय अंदाज बांधतील याचा नेम नाही. हे दोघे या कॅफेत एकत्र येणं हा केवळ एक योगायोग होता का? पण या चर्चांवर दोघांनीही भाष्य केलं नाही. त्यामुळे जो तो आपल्या पद्धतीने या चर्चा रंगवत आहे. यशस्वी जयस्वाल हा 24 वर्षांचा, तर मृणाल ठाकुर ही 33 वर्षांची आहे. या दोघांमध्ये जवळपास 9 वर्षांचा फरक आहे.

त्यामुळे या चर्चा निरर्थक वाटत असल्या तरी सोशल मीडियावर रान पेटलं आहे. यशस्वी जयस्वालचं कोणासोबत नाव जुळण्याची ही काय पहिली वेळ नाही. यापूर्वी युकेच्या मॅडी हॅमिल्टनसोबत त्याचं नाव जोडलं गेलं. तेव्हाही अनेकांनी त्याची प्रेयसी असल्याचं सांगितलं होतं. पण त्यावर यशस्वी जयस्वालने अधिकृतपणे कधीच भाष्य केलं नाही. दुसरीकडे, मृणाल ठाकुरचं नाव दाक्षिणात्य चित्रपटसृष्टीतील प्रसिद्ध अभिनेता धनुषसोबत जोडलं गेलं आहे. त्यांच्या लग्नाच्या अफवाही उडाल्या होत्या. मात्र दोघांनीही या बातम्यांचं खंडन केलं आणि धुराळा शांत झाला.

## मला काही सांगायची गरज नाही ?" संजू सॅमसनला राग अनावर

■ मुंबई/वृत्तसंस्था

भारताचा वरिष्ठ यष्टीरक्षक-फलंदाज संजू सॅमसनने खुलासा केला आहे की, टी-20 विश्वचषकापूर्वी "मी पूर्णपणे स्वतःच्या अटींवर क्रिकेट खेळण्याचा निर्णय घेतला होता. मी स्पर्धेच्या शर्यतीत सामील होणार नाही आणि आपल्या अंतर्ज्ञानावर विश्वास ठेवत राहील." संजू सॅमसनने आपल्या आंतरराष्ट्रीय कारकिर्दीत अनेक चढ-उतार अनुभवले आहेत. त्याने लहान वयातच आंतरराष्ट्रीय पदार्पण केले, पण संधींसाठी त्याला बराच काळ वाट पाहावी लागली. जेव्हा असे वाटत होते की संघात त्याचे स्थान पक्के झाले आहे, तेव्हा एका मोठ्या स्पर्धेच्या अगदी आधी त्याने ते गमावले, पण त्याने संघर्ष करून पुनरागमन केले आणि तो यशस्वी झाला.सॅमसन म्हणाला, "या संघर्षांनी मला एक अत्यंत आत्मविश्वासू फलंदाज बनवले आहे, ज्याला आपल्या क्षमतेवर पूर्ण विश्वास आहे. इतकेच नाही, तर मी आता हा खेळ पूर्णपणे स्वतःच्या अटींवर खेळण्याचा निर्णय घेतला आहे. 2026 च्या टी-20 विश्वचषकापूर्वी, त्याने स्पर्धेच्या शर्यतीत सामील न होण्याचा आणि केवळ आपल्या खेळाचा आनंद घेण्यावर लक्ष केंद्रित करण्याचा जाणीवपूर्वक निर्णय घेतला होता. संघात सतत चढाओढ सुरू असल्याचे माझ्या लक्षात आले होते आणि 2026 च्या टी20 विश्वचषकापूर्वीच मी ठरवले होते की मी त्यात सहभागी होणार नाही. मला फक्त खेळाचा आनंद घ्यायचा होता."2026 च्या टी20 विश्वचषकापूर्वी, सॅमसनने टी20 आंतरराष्ट्रीय सामन्यांमध्ये भारताचा प्रथम पसंतीचा सलामीवीर म्हणून आपले स्थान पक्के करण्याइतपत चांगली कामगिरी केली होती. परिस्थिती झपाट्याने बदलली आणि त्याला फलंदाजीच्या क्रमात खाली ढकलण्यात आले; प्रथम शुभमन गिलच्या पुनरागमनामुळे आणि नंतर इशान किशनमुळे, ज्यामुळे त्याचा स्वतःचा फॉर्महीखालावला. या बदलांचा सॅमसनच्या कामगिरीवर परिणाम झाला आणि विश्वचषकापूर्वीच्या भारताच्या अंतिम टी20 आंतरराष्ट्रीय मालिकेत खराब कामगिरी केल्यानंतर, संघ व्यवस्थापनाने मोठ्या स्पर्धेत अभिषेक शर्मा आणि इशान यांना डावाची सुरुवात करायला लावण्याचा निर्णय घेतला. पण नंतर संघात त्याची एन्ट्री झाली आणि नंतर त्याने भारतीय संघाला विश्वचषक जिंकून द्याला मदत केली.सॅमसनने सांगितले की, "मी आता 31 वर्षांचा आहे आणि माझ्यात अजून काही वर्षे शिल्लक आहेत. त्यामुळे, मी स्वतःच्या अटींवर खेळण्याचा निर्णय घेतला आहे. मला कोणीही सांगणार नाही की फलंदाजी कशी करावी किंवा काय करावे. मी स्वतःचे निर्णय घेईल आणि आदराने खेळेल."



# मला गंभीर आजार, पुढील उपचारांसाठी भारतात..; 'बिग बॉस' फेम अभिनेत्रीचा आरोग्याविषयी मोठा खुलासा

बिग बॉस' फेम अभिनेत्री जास्मीन भसीन गेल्या दीड महिन्यापासून आरोग्याशी संबंधित विविध समस्यांचा सामना करत आहे. गेल्या महिन्यात ती तिच्या वाढदिवशीच दुबईतल्या रुग्णालयात दाखल होती. जास्मीनचा रुग्णालयातील एक फोटो तिचा बॉयफ्रेंड अली गोणीने सोशल मीडियावर शेअर केला होता. यादरम्यान आता जास्मीनने तिच्या आरोग्याविषयी मोठा खुलासा केला आहे. डॉक्टरांनी तिला एका गंभीर आजाराची शंका व्यक्त केली असून त्यावरील उपचार सुरू आहेत. वाढदिवस साजरा करण्यासाठी जास्मीन दुबईला गेली होती. मात्र दुबईत पोहोचताच तिची प्रकृती बिघडली. दुसऱ्याच दिवशी तिला कणकण जाणवू लागली होती. थकव्यामुळे कणकण जाणवत असेल, असं वाटून जास्मीनने गोळी घेतली. पण तीन दिवसांपर्यंत तिचा ताप उतरला नव्हता.पिंकविला' या वेबसाइटला दिलेल्या मुलाखतीत जास्मीन म्हणाली, "दुबईला पोहोचल्यानंतर मला अस्वस्थ वाटू लागलं होतं. दुसऱ्याच दिवशी मला





ताप आला होता. हे सर्व थकव्यामुळे होतंय, असं मला वाटत होतं. म्हणून मी पॅरासिटामॉल ड्रिप आणि आयव्ही फ्लुएइस घेतले. पण तीन दिवसांपर्यंत माझा ताप उतरला नव्हता आणि माझी प्रकृती आणखीनच बिघडली. मग मी अली आणि माझ्या मित्रांना रुग्णालयात घेऊन जायला सांगितलं. माझ्या शरीरातील संसर्ग आणि दाह यांचं प्रमाण तपासण्यासाठी डॉक्टरांनी सीआरपी (CRP) चाचणी केली. "ज्याची सामान्य पातळी 0 ते 5 असतं. पण माझ्यात ती पातळी 323 होती, जी खूप चिंताजनक होती. डॉक्टरांनी मला सांगितलं की माझ्या आतड्याच्या एका बाजूला सूज आली होती. त्यामुळे मला गंभीर आजाराचा संशय आला.

त्यामुळे पुढील उपचारांसाठी मी भारतात परतले आहे. देवाच्या कृपेने मी आता बरी आहे. पण गेल्या दीड महिन्यापासून मी सतत आजारी पडत होते. आता तर 'मी बरी आहे' असं म्हणायलही मला भीती वाटते. मला असं वाटतंय की, यानिमित्ताने देव मला स्वत:साठी वेळ काढण्याचे आणि स्वत:वर प्रेम करण्याचे संकेत देत आहे. आता मी आधीपेक्षा अधिक स्वत:ची काळजी घेत आहे", असं तिने पुढे सांगितलं.जास्मीनला टर्मिनल इलियटीस नावाचा आजार आहे. ज्यामुळे लहान आतड्याला सूज येते. यामुळे पोटदुखी, उलट्या, सूज आणि आरोग्याशी संबंधित इतर गुंतागुंत निर्माण होतात.

## थलपति विजय यांच्यानंतर साऊथमधील मोठ्या सुपरस्टारची राजकारणात एन्ट्री ?

दाक्षिणात्य चित्रपटसृष्टीतील लोकप्रिय अभिनेता धनुष याच्या राजकारणातील संभाव्य प्रवेशाबाबत पुन्हा एकदा चर्चा सुरू झाली आहे. तमिळनाडूतील तिरुवल्लूर जिल्ह्यात त्याच्या फॅन क्लबच्या वतीने मोठ्या प्रमाणावर सामाजिक आणि जनकल्याणाचे उपक्रम आयोजित करण्यात आले. या कार्यक्रमानंतर धनुषही अभिनेता थलपती विजय यांच्या पावलावर पाऊल ठेवत राजकारणात उतरणार असल्याच्या चर्चांना जोर आला आहे. मात्र, धनुषने अद्याप याबाबत कोणतीही अधिकृत घोषणा केलेली नाही.चेन्नई येथे आयोजित कार्यक्रमात धनुषने चाहत्यांना समाजोपयोगी कामांमध्ये अधिक सक्रिय होण्याचे आवाहन केले. आपल्या परिसरातील गरजू कुटुंबांच्या गरजा समजून घेऊन त्यांना शक्य ती मदत करण्याचे आवाहन त्याने केले. यावेळी मोठ्या संख्येने चाहते उपस्थित होते. त्यांना संबोधित करताना धनुष म्हणाला, 'एका ठिकाणी इतक्या मोठ्या संख्येने लोक एकत्र आले आहेत. या एकतेत मोठी ताकद आहे. मात्र, या एकतेला समाजहिताचे उद्दिष्ट मिळणे आवश्यक आहे.'त्याने पुढे सांगितले की, 'फक्त ऑडिओ लॉन्च किंवा चाहत्यांच्या भेटीगाठींपुरते मर्यादित राहू नका. समाजासाठी अधिकाधिक कल्याणकारी कामांमध्ये सहभागी व्हा. आपल्या परिसरातील लोकांच्या अडचणी समजून घ्या आणि त्यांना शक्य तितकी मदत करा. तुम्ही अशी कामे कराल, याची मला खात्री आहे आणि त्यामुळे मला तुमचा आणखी अभिमान वाटेल' असं तो म्हणला.या कार्यक्रमात धनुषने आपल्या फॅन क्लबच्या नव्या ध्वजाचेही अनावरण केले. यानंतर अनेकांनी त्याची तुलना अभिनेता आणि राजकारणी थलपती विजय यांच्याशी केली. विजय यांनीही अनेक वर्षे चाहतावर्गाच्या माध्यमातून विविध सामाजिक उपक्रम राबविल्यानंतर राजकारणात प्रवेश केला होता. त्यामुळे धनुषही त्याच मार्गावर असल्याची चर्चा रंगली आहे.धनुषच्या भाषणाचा व्हिडिओ सोशल मीडियावर मोठ्या प्रमाणात व्हायरल झाला असून त्यावर विविध प्रतिक्रिया उमटत आहेत. अनेकांनी त्याचे राजकारणात स्वागत करत शुभेच्छा दिल्या. या सर्व चर्चादरम्यान धनुषने राजकारणात प्रवेशाबाबत कोणतीही अधिकृत भूमिका जाहीर केलेली नाही.

## यात काय चुकीचं आहे ? कंगना रणौतबद्दल चांगलं बोलली म्हणून दक्षिणेतली प्रसिद्ध अभिनेत्री ट्रोल

दक्षिणेतील प्रसिद्ध अभिनेत्री ऐश्वर्या लक्ष्मीला अभिनेत्री कंगना राणौतबद्दल मोकळेपणाने बोलणं चांगलचं महाग पडतय. 'गट्टा कुश्ती 2' या चित्रपटाच्या प्रमोशनवेळी अभिनेत्री ऐश्वर्या लक्ष्मीने मुलाखत दिली होती. त्यावेळी ती कंगना राणौत बद्दल बोलली होती. आता महिन्याभराने ऐश्वर्याची ती क्लिप पुन्हा व्हायरल झाली आहे.ऐश्वर्या लक्ष्मीने ती कंगना राणौतची मोठी चाहती असल्याचं म्हटलं होतं. त्यासाठी तिला मोठ्या प्रमाणात ट्रोल करण्यात आलं. ऐश्वर्याच्या या मताबद्दल इंटरनेटवर दोन मतप्रवाह आहेत. ऐश्वर्या लक्ष्मीने जून महिन्यात गल्लता प्लसला मुलाखत दिली. त्यावेळी स्वत:च्या करिअरबद्दल बोलताना ऐश्वर्याने कंगनाबद्दल सुद्धा बोलली.मला आता पटकन कंगना बोललेली ते आठवलं. मला कंगना आवडते. मला असं वाटतं की, ती मॅड जिनियस म्हणजे प्रतिभावंत आहे पण थोडी फटकळ आहे. चांगलं बोलण्यासाठी तिने स्वत:ला कसं तयार केलय ते मला आवडतं. ती एक चांगली वक्ता आहे. संसदेत ती जी भाषणं देते ती मला आवडतात. मी तिची खूप मोठी





चाहती आहे" असं ऐश्वर्या लक्ष्मी म्हणालेली. मला माहित नाही, मी त्या विषयाकडे का वळले?. माझ्या मनात तो विचार आला, कारण फक्त मोठ्या नावांसोबत काम करणं महत्वाचं नाहीय. त्यांच्याकडून आपण काय शिकतो हे सुद्धा महत्वाचं आहे" असं ऐश्वर्या लक्ष्मी म्हणालेली. ऐश्वर्या लक्ष्मीची ती क्लिप पुन्हा एकदा व्हायरल होतेय. इंटरनेटवर त्या बद्दल वेगवेगळी ठाम मतं आहेत. काही युजर्सनी ऐश्वर्या लक्ष्मीवर टीका केली आहे. एका युजरने लिहिलय मला ऐश्वर्या लक्ष्मीची मतं आवडतात. पण हे मत नाही पटलं. एकाने लिहिलय कदाचित ती कंगनाच्या पावलावर पाऊल टाकणार असेलकंगनाचे चाहते तिच्या बचावासाठी पुढे आले आहेत. आपल्याला एखादा कलाकार आवडणं यात काय चुकीचं आहे?. कंगनाचे सुरुवातीचे चित्रपट खूप चांगले होते असं एका एक्स युजरने लिहिलय. ती खरचं प्रतिभावान आहे. बॉलिवूडमधील ती एक चांगली अभिनेत्री आहे अशी एका फॅनने कमेंट केलीय. एकाने विचारलय प्रॉब्लेम काय आहे? ऐश्वर्या फक्त कंगनाच्या भाषणांबद्दल बोलत होती, तिच्या राजकीय भूमिकांबद्दल ती बोलली नाही.

# 'फैजा' नावावरून तुफान ट्रोलिंग; 'तिने निकाह केला असेल तर

ससुराल सिमर का' या मालिकेतून घराघरात पोहोचलेली अभिनेत्री दीपिका कक्कर तिच्या खासगी आयुष्यामुळे नेहमीच चर्चेत असते. दीपिकाने याच मालिकेतील सहअभिनेता शोएब इब्राहिमशी आंतरधर्मीय लग्न केलं. दीपिका हिंदू असून शोएब मुस्लीम आहे. त्यामुळे शोएबशी निकाह करताना तिने तिचं नाव बदलून 'फैजा' असं ठेवल्याचं म्हटलं जातं. यावरून अनेकदा तिला ट्रोलिंगचा सामना करावा लागला. आता ज्येष्ठ अभिनेत्री शगुफ्ता अली यांनी यावर पहिल्यांदाच प्रतिक्रिया दिली आहे. सिद्धार्थ कन्ननला दिलेल्या मुलाखतीत शगुफ्ताने दीपिकाला ट्रोल करणाऱ्यांना खडेबोल सुनावले आहेत. जर दीपिका आणि शोएब त्यांच्या आयुष्यात खुश असतील तर याने इतरांना काय त्रास आहे, असा सवाल त्यांनी केला आहे.शगुफ्ता म्हणाल्या, "दीपिकाने तिच्या मर्जीने लग्न केलं आहे. ती तिच्या पतीसोबत खुश आहे आणि तिला तिचं भविष्य माहीत आहे. जर ती खुश आहे तर लोकांना का त्रास होतोय? तुम्ही त्यांचे खर्च उचलत आहात का? तुम्ही त्यांना राशन-पाणी देत आहात का? जर पती-पत्नी त्यांच्या आयुष्यात खुश आहेत तर याने दुसऱ्यांना काय समस्या आहे? कृपया त्या दोघांना सोडा. दीपिका खूपच प्रेमळ आणि मनमिळाऊ आहे. जर कोणाला दीपिका आणि शोएबचे व्लॉग पसंत नसतील, तर त्यांना ते बघणं बंधनकारक नाहीये. त्यांचे व्लॉग्स बघायचे नसतील तर बघू नका. परंतु प्रत्येक गोष्टीवर ट्रोलिंग का?





व्हिडीओ पाहू नका, हा पर्याय तुमच्याकड आहे."दीपिकाच्या 'फैजा' नावावरून होणाऱ्या ट्रोलिंगबद्दलही त्यांनी प्रतिक्रिया दिली आहे. "जर तिने निकाह केला असेल किंवा नोंदणी पद्धतीने लग्न केलं असेल तर ही तिची मर्जी आहे. परंतु ती आजही दीपिका कक्कर याच नावाने काम करतेय. शोएबने कधीच म्हटलं नाही की तिला दीपिका बोलू नका, फक्त फैजा म्हणूनच हाक मारा. जर त्यांच्यात काही समस्या नाहीये तर लोकांना का आहे? सोशल मीडियावर लोक विनाकारण दुसऱ्यांच्या आयुष्यात ढवळाढवळ करतात. लोकांना इतरांचा आनंद बघवत नाही. मी नेहमी हेच पाहिलं आहे.

त्यांचं आयुष्य आहे, त्यांना जसं जगायचं असेल तसं जगू द्या. मी तर म्हणते व्लॉग करणंच सोडून दिलं पाहिजे. जेव्हा आपलं आयुष्य सर्वांसमोर येतं, तेव्हा प्रत्येक गोष्टीचं उत्तर द्यावं लागतं. दोघांना इतकं ट्रोल करण्यात आलं की ते रडू लागले. ही तर हद्दच झाली. त्यांना त्यांचं आयुष्य सुखाने जगू द्या", अशा शब्दांत त्यांनी टीकाकारांना फटकारलं आहे.

# मधमाशी पालनासाठी ५० टक्के अनुदान; पात्र लाभार्थ्यांकडून अर्ज मागविले

**जनसंचलन/बुलढाणा**

उद्योग, ऊर्जा व कामगार विभागाच्या शासन निर्णयानुसार महाराष्ट्र राज्य खादी व ग्रामोद्योग मंडळामार्फत राज्यभर मधकेंद्र (मधमाशी पालन) योजना राबविण्यात येत असून, या योजनेसाठी पात्र व्यक्ती व संस्थांकडून अर्ज मागविण्यात आले आहेत. या योजनेअंतर्गत लाभार्थ्यांना मध उद्योगाचे मोफत प्रशिक्षण, मधमाशी पालनासाठी आवश्यक साहित्यावर ५० टक्के अनुदान आणि उर्वरित ५० टक्के स्वगुंतवणूक, शासनाच्या हमीभावाने मध खरेदी तसेच विशेष तांत्रिक प्रशिक्षणाची सुविधा उपलब्ध करून दिली जाणार आहे. याशिवाय मधमाशांचे संरक्षण व संवर्धनाबाबत जनजागृतीही करण्यात येणार आहे. योजनेत वैयक्तिक मधपाळ, प्रगतीशील मधपाळ (केंद्रचालक) आणि नोंदणीकृत संस्था अशा तीन प्रवर्गांचा समावेश आहे. वैयक्तिक मधपाळांना १० मधपेट्यांचा लाभ दिला जाणार असून अर्जदार साक्षर, १८ वर्षांपेक्षा जास्त वयाचा असावा. स्वतःची शेती असल्यास प्राधान्य दिले जाईल. प्रगतीशील मधपाळ (केंद्रचालक) यांच्यासाठी किमान दहावी उत्तीर्ण, वय २१ वर्षांपेक्षा अधिक, स्वतःच्या किंवा कुटुंबाच्या नावावर अथवा भाडेतत्त्वावरील किमान एक एकर शेती असणे आवश्यक आहे. तसेच मधमाशी पालन, प्रजनन आणि मध उत्पादनाबाबत प्रशिक्षण देण्याची क्षमता व सुविधा असणे गरजेचे आहे. संस्थांसाठी संस्था नोंदणीकृत असणे, स्वतःच्या किंवा भाडेतत्त्वावरील किमान एक हजार चौरस फूट इमारत उपलब्ध असणे तसेच प्रशिक्षण देण्यासाठी आवश्यक सुविधा असणे बंधनकारक आहे. केंद्रचालकांनी मधपेट्या ५० टक्के अनुदानावर घेण्यासाठी उर्वरित ५० टक्के रक्कम प्रथम जिल्हा कार्यालयात जमा करणे आवश्यक राहील. लाभार्थी निवडीनंतर प्रशिक्षणापूर्वी मध व्यवसाय सुरू करण्याबाबत मंडळास बंधपत्र देणे आवश्यक असून प्रशिक्षण मंडळामार्फत पूर्णपणे मोफत दिले जाईल. मंडळाने निश्चित केलेल्या ठिकाणी प्रशिक्षण घेणे अनिवार्य राहणार आहे. योजनेचे अर्ज महाराष्ट्र राज्य खादी व ग्रामोद्योग मंडळ, जिल्हा कार्यालय, बुलढाणा येथे उपलब्ध आहेत. अधिक माहितीसाठी जिल्हा ग्रामोद्योग अधिकारी, आशिर्वाद बिल्डिंग, मुजे ले-आऊट, मलेरिया कार्यालयाजवळ, बुलढाणा येथे संपर्क साधावा, तसेच दूरध्वनी (०७२६२) २९९०७६, मोबाईल ९८२२५२८५३४, ७०५७८८७८८७, ९८८१९११०८४, ई-मेल : .. किंवा मध संचालनालय, महाराष्ट्र राज्य खादी व ग्रामोद्योग मंडळ, महाबळेश्वर, जि. सातारा येथेही संपर्क साधता येईल.

# प्रवाश्यांच्या समस्या व तक्रार निराकरणासाठी प्रवासी राजा व कामगार पालक दिनाचे आयोजन

**जनसंचलन बुलढाणा**



महाराष्ट्र राज्य मार्ग परिवहन महामंडळ बुलढाणा विभागाकडून प्रवाशांना भेडसावणाऱ्या दैनंदिन समस्या, तक्रारी व सुचनांचे आगार पातळीवर जलदगतीने निराकरण करण्यासाठी जिल्ह्यातील प्रत्येक आगारात दर महिण्याच्या बुधवारी सकाळी १० ते २ या वेळेत ङ्ख्खप्रवासी राजा दिनफ्फ व दुपारी ३ ते ५ या वेळेत ङ्ख्खकामगार पालक दिनफ्फ आयोजित करण्यात येणार आहे. त्याअनुषंगाने वेळापत्रक जाहीर करण्यात आले असून प्रवाशी आणि महामंडळाच्या कामगारांनी लाभ घेऊन समस्यांचे निराकरण करावे, असे आवाहन राज्य मार्ग परिवहन महामंडळाचे विभाग नियंत्रक यांनी केले आहे. परिवहन महामंडळाच्या आगारामध्ये सकाळी १० ते दुपारी २ दरम्यान प्रवासी राजा दिन साजरा करण्यात येणार आहे. यावेळेत प्रवासी, प्रवासी संघटना, शाळा-महाविद्यालये त्यांच्या समस्या, तक्रारी, सूचना लेखी स्वरुपात मांडू शकतील. तसेच दुपारी ३ ते सायंकाळी ५ दरम्यान कामगार पालक दिन साजरा करण्यात येणार आहे. संघटना, कर्मचाऱ्यांचे प्रश्न, तक्रारी लेखी स्वरुपात घेऊन तक्रारीचे किंवा समस्यांचे तत्काळ निराकरण करतील. बुलढाणा विभागातील बुलढाणा आगार येथे दि.२९.जुलै ,चिखली आगार येथे दि. ५ ऑगस्ट, खामगाव आगार येथे दि. १२ ऑगस्ट, मेहकर आगार येथे दि. १९ ऑगस्ट , मलकापुर येथे दि. २ सप्टेंबर, जळगाव जामोद येथे दि. ९ सप्टेंबर व शेगांव आगार येथे दि. १६ सप्टेंबर रोजी प्रवासी राजा दिन व कामगार पालक दिन कार्यक्रम घेण्यात येणार आहे. जिल्ह्यातील एसटी बर प्रवाशी व कामगारांनी या सेवेचा लाभ घेवून आपल्या समस्यांचे निराकरण करावे, असे आवाहन विभाग नियंत्रक यांनी केले आहे.

# ऑनलाइन क्रीडा स्पर्धा सॉफ्टवेअरचे ३ ऑगस्टला प्रशिक्षण; जिल्ह्यातील क्रीडा शिक्षक, संगणक चालक व क्रीडा संघटनांच्या पदाधिकाऱ्यांना उपस्थितीचे आवाहन

**जनसंचलन बुलढाणा**



क्रीडा व युवक सेवा संचालनालय, पुणे अंतर्गत जिल्हा क्रीडा अधिकारी कार्यालय व जिल्हा क्रीडा परिषद, बुलढाणा यांच्या संयुक्त विद्यमाने तसेच जिल्ह्यातील विविध एकविध खेळ संघटनांच्या तांत्रिक सहकार्याने आयोजित करण्यात येणाऱ्या शालेय क्रीडा स्पर्धांच्या पार्श्वभूमीवर ऑनलाइन सॉफ्टवेअर हाताळणीचे प्रशिक्षण सोमवार, ३ ऑगस्ट २०२६ रोजी जिल्हा क्रीडा संकुल, क्रीडानगरी, जांभरून रोड, बुलढाणा येथे आयोजित करण्यात आले आहे. सन २०२६-२७ या शैक्षणिक सत्रात तालुकास्तरापासून राष्ट्रीय स्तरापर्यंत होणाऱ्या विविध क्रीडा स्पर्धांसाठी प्रवेश अर्ज ऑनलाइन सॉफ्टवेअरच्या माध्यमातून स्वीकारले जाणार आहेत. या सॉफ्टवेअरची प्रभावी हाताळणी, स्पर्धांचे नियोजन आणि आयोजन सुलभ व्हावे, यासाठी हे प्रशिक्षण आयोजित करण्यात आले आहे. प्रशिक्षणाचे दोन सत्रांमध्ये आयोजन करण्यात आले आहे. सकाळी ११ ते दुपारी १ या वेळेत मोताळा, मलकापूर, खामगाव, शेगाव, संग्रामपूर, जळगाव जामोद आणि नांदुरा तालुक्यातील शिक्षक व प्रतिनिधींसाठी प्रशिक्षण होणार आहे. तर दुपारी २ ते सायंकाळी ४ या वेळेत सिंदखेड राजा, मेहकर, लोणार, चिखली, देऊळगाव राजा आणि बुलढाणा तालुक्यातील सहभागींसाठी प्रशिक्षण आयोजित करण्यात आले आहे. जिल्ह्यातील सर्व व्यवस्थापनांच्या शाळा, विद्यालये व कनिष्ठ महाविद्यालयांतील क्रीडा शिक्षक, ऑनलाइन कामकाज पाहणारे संगणक चालक तसेच विविध खेळ संघटनांचे पदाधिकारी यांनी नियोजित वेळेनुसार मोठ्या संख्येने उपस्थित राहावे, असे आवाहन जिल्हा क्रीडा अधिकारी भक्ती आंब्रे यांनी केले आहे.

# ३१ जुलैपर्यंत पीक विमा भरण्याचे आवाहन; नैसर्गिक आपत्तीपासून पिकांना मिळणार आर्थिक संरक्षण

**जनसंचलन-बुलढाणा**




खरीप हंगाम २०२६-२७ साठी बुलढाणा जिल्ह्यात प्रधानमंत्री पीक विमा योजना लागू करण्यात आली असून, यंदा बजाज जनरल इन्शुरन्स कंपनी लिमिटेडची जिल्ह्यासाठी अधिकृत विमा कंपनी म्हणून नियुक्ती करण्यात आली आहे. नैसर्गिक आपत्ती, अवकाळी पाऊस, दुष्काळ तसेच कीड-रोगांमुळे होणाऱ्या पिकांच्या नुकसानीपासून आर्थिक संरक्षण मिळावे, यासाठी सर्व कर्जदार व बिगर कर्जदार शेतकऱ्यांनी ३१ जुलैपूर्वी पीक विमा भरावा, असे आवाहन जिल्हाधिकारी डॉ. प्रविणकुमार देवरे आणि जिल्हा अधीक्षक कृषी अधिकारी संतोष डाबरे यांनी केले आहे. शेतकरी आपल्या जवळील कॉमन सर्व्हिस सेंटर (), महा-ई-सेवा केंद्र, बँक तसेच प्रधानमंत्री पीक विमा योजनेच्या अधिकृत पोर्टलद्वारे पीक विमा भरू शकतात. योजनेत सहभागी होण्यासाठी ३१ जुलै २०२६ ही अंतिम मुदत असून, त्यानंतर अर्ज स्वीकारले जाणार नाहीत. त्यामुळे अंतिम दिवसाची वाट न पाहता वेळेत विमा भरून पिकांचे संरक्षण करावे, असे प्रशासनाने स्पष्ट केले आहे. विमा भरताना किंवा पिकाच्या नुकसानीची माहिती नोंदविताना अडचण आल्यास संबंधित तालुक्यातील बजाज जनरल इन्शुरन्स कंपनीचे तालुका समन्वयक किंवा तालुका कृषी अधिकारी कार्यालयाशी संपर्क साधण्याचे आवाहन जिल्हा अधीक्षक कृषी अधिकारी संतोष डाबरे यांनी केले आहे. जिल्हा व तालुका स्तरावर कंपनीचे प्रतिनिधी नियुक्त करण्यात आले असून प्रत्येक तालुक्यासाठी स्वतंत्र समन्वयक उपलब्ध आहेत. पीकनिहाय शेतकरी हिस्सा (प्रति हेक्टर विमा हप्ता) सोयाबीन ₹१,२५०, कापूस ₹१,३००, तूर ₹९४०, मुग ₹७५, उडीद ₹६७.५०, मका ₹१०० प्रमाणे आहे. नैसर्गिक आपत्तीमुळे होणाऱ्या आर्थिक नुकसानीपासून संरक्षण मिळविण्यासाठी सर्व पात्र शेतकऱ्यांनी अंतिम मुदतीपूर्वी पीक विमा योजनेत सहभागी व्हावे, असे आवाहन जिल्हा प्रशासनाने केले आहे.

# बुलढाणा जिल्ह्यात महिला व मुलींच्या सुरक्षेसाठी पोलीस दामिनी पथक ॲक्शन मोडवर!

# मजनू व टवाळखोरांवर होणार कडक कारवाई; डायल ११२ आणि कायद्याबाबत जनजागृती अभियान सुरू

जनसंचलन-बुलढाणा

:बुलढाणा जिल्ह्यातील महिला, तरुणी व शाळकरी मुला-मुलींच्या सुरक्षिततेला सर्वोच्च प्राधान्य देत पोलीस अधीक्षक श्री. निलेश तांबे यांच्या संकल्पनेतून आणि मार्गदर्शनाखाली संपूर्ण जिल्ह्यात ङ्गपोलीस दामिनी पथकफ पूर्ण क्षमतेने सक्रीय झाले आहे. शाळा, महाविद्यालये, बसस्थानक, कोचिंग क्लासेस, बाजारपेठ आणि वर्दळीच्या ठिकाणी या पथकांकडून विशेष गस्त घालण्यात येत असून टवाळखोरांवर पोलिसांची करडी नजर आहे. पोलीस अधीक्षकांच्या निर्देशांनुसार बुलढाणा, खामगाव, मलकापूर, मेहकर आणि देऊळगाव राजा या सर्व उपविभागांतील पोलीस ठाण्यांचे प्रभारी अधिकारी व दामिनी पथके थेट मैदानावर उतरली आहेत. महिला वसतिगृहे, बसस्थानके, रेल्वे स्टेशन, कोचिंग क्लासेस आणि शाळा-महाविद्यालयांच्या परिसरात गस्त वाढवण्यात आली आहे. तसेच शालेय शिक्षक, महाविद्यालयीन प्राध्यापक व पालकांशी सुसंवाद साधून महिलांच्या सुरक्षेबाबत चर्चा केली जात आहे.दामिनी पथकाद्वारे महिला व मुलींना संकटसमयी मदतीसाठी ङ्गडायल ११२फ आणि ङ्गदामिनी पथकफ यांचा संपर्क कसा साधावा, याची माहिती दिली जात आहे. याशिवाय, नव्याने लागू झालेली भारतीय न्याय संहिता, भारतीय नागरीक सुरक्षा संहिता, भारतीय साक्ष अधिनियम यासह पोक्सो





() कायदा व बाल न्याय कायद्यातील महत्त्वाच्या तरतुदी आणि कायदेशीर हक्कांबाबत महिला व विद्यार्थिनींमध्ये जनजागृती करण्यात येत आहे.गस्तीदरम्यान रस्त्यांवर, शाळा-कॉलेजच्या बाहेर विनाकारण घिरट्या घालणाऱ्या किंवा टवाळखोरी करणाऱ्यांवर प्रचलित कायद्यानुसार कठोर प्रतिबंधात्मक कारवाई केली जात आहे. भविष्यात अशा टवाळखोरांकडून कोणत्याही नागरिक किंवा विद्यार्थिनीला त्रास होणार नाही, याची दक्षता घेतली जात आहे. तसेच महिलांकडून प्राप्त होणाऱ्या तक्रारींवर पोलीस प्रशासनाकडून तातडीने आणि शीघ्र गतीने कारवाई केली जात आहे.ही संपूर्ण मोहीम पोलीस अधीक्षक श्री. निलेश तांबे यांच्या मार्गदर्शनाखाली, अपर पोलीस अधीक्षक (खामगाव व बुलढाणा), उपविभागीय पोलीस अधिकारी, सर्व पोलीस ठाण्याचे प्रभारी अधिकारी आणि दामिनी पथकातील पोलीस अधिकारी व अंमलदारांमार्फत अतिशय प्रभावीपणे राबवली जात आहे.

# आषाढी एकादशी व कारगिल विजय दिवस फराळ फळ बिस्कीट वाटप एकनिष्ठाचा उपक्रम

जनसंचलन-खामगाव

आषाढी एकादशी व कारगिल विजय दिनाचे औचित्य साधून एकनिष्ठा गौ सेवा रक्तसेवा फाउंडेशनच्या वतीने खामगाव येथील सामान्य रुग्णालयात रुग्ण व त्यांच्या नातेवाईकांसाठी सलग दोन दिवस सेवा उपक्रम राबविण्यात आला. आषाढी एकादशीला फराळी चिवडा वाटप दि. २५ जुलै २०२६ शुक्रवार रोजी आषाढी एकादशीनिमित्त सामान्य रुग्णालयात उपचारासाठी आलेल्या रुग्णांच्या नातेवाईकांना फराळी चिवड्याचे ५०० पाकिटे वाटप करण्यात आली. उपवास असलेल्या नागरिकांना याचा मोठा दिलासा मिळाला. ❊कारगिल विजय दिवस केळी व बिस्कीट वाटप❊ दि. २६ जुलै २०२६ शनिवार रोजी कारगिल विजय दिवस देशभक्तीच्या भावने साजरा करण्यात आला. यावेळी शहीद जवानांना श्रद्धांजली वाहून रुग्ण व त्यांच्या नातेवाईकांना केळी व पारले-जी बिस्कीट वाटप करण्यात आले. ❊वाढदिवसही साजरा केला सेवेतून❊ हा संपूर्ण उपक्रम ❊सुरजभैय्या यादव❊ यांच्या संकल्पनेतून राबविण्यात आला. तसेच फाउंडेशनचे तालुका उपसचिन विक्की इंगळे यांनी त्यांची कन्या ❊कु. सवी विक्की इंगळे❊ वय ३ वर्ष या चिमुकलीच्या वाढदिवसानिमित्त कोणताही व्यर्थ खर्च न करता, सामाजिक बांधिलकी जपत सामान्य रुग्णालयातील गरजू रुग्ण व त्यांच्या नातेवाईकांना केळी व बिस्कीट वाटप करण्यात आले. या उपक्रमामुळे रुग्णालयात सेवाभावाचे आणि देशभक्तीचे वातावरण निर्माण



झाले होते. एकनिष्ठा गौ सेवा रक्तसेवा फाउंडेशनच्या या सामाजिक उपक्रमाचे नागरिक व रुग्णांच्या नातेवाईकांकडून विशेष कौतुक करण्यात आले. या दोन दिवसीय उपक्रमात प्रमुख उपस्थित

